# अक्विल्ला व प्रिस्किल्ला हयांनी नव्या पुढायांना मार्गदर्शन केले

## मुलांना शिकवणाऱ्यांनी एम 1 बी हा अभ्यास वाचावा.

**प्रार्थना :** ''प्रिय स्वर्गातील पित्या, नवीन पुढायांना मार्गदर्शन करण्यास, लोकांची सेवा करण्याकरीता त्यांना बोध करण्यास माझे साहाय्य कर. मी मार्गदर्शन करीत असलेल्यांनी इतर नव्या पुढायांना मार्गदर्शन करावे यासाठी त्यांना साहाय्य कर. यामुळे पृथ्वीवरील तुझ्या राज्याचा सतत विस्तार होत राहिल.''

1. **इतरांना मार्गदर्शन करण्यासाठी तुम्ही स्वत:ची देवाच्या वचनातून तयारी करा.**

**पाहा,** अक्विल्ला व प्रिस्किल्ला ह्यांनी अपुल्लोला कसे मार्गदर्शन केले, प्रे. कृ. 18:24-28.



- अक्विल्ला व प्रिस्किल्ला ह्यांनी अपुल्लोला मार्गदर्शन त्याची गरज जाणून घेण्यापूर्वी केले की जाणून घेतल्यावर केले?
- अपुल्लोची/नेमकी गरज समजून घेतल्यावर अक्विल्ला व प्रिस्किल्ला ह्यांनी त्याला कोठे मार्गदर्शन केले?
- अक्विल्ला व प्रिस्किल्ला ह्यांनी आपल्या घरात अपुल्लोला मार्गदर्शन केल्यावर त्याने काय केले? (पाहा वचने 27 व 28)
- अक्विल्ला व प्रिस्किल्ला ह्यांनी ख्रिस्ताची सेवा करण्यासाठी एकत्रित पणे समन्वयाने एक चमू म्हणून काम केले. तुमच्या मंडळीतील विवाहित दांपत्याला अशा प्रकारे एकत्रितपणे काम करण्यासाठी मदत म्हणून आपल्याला काय करता येईल?

पुढायांना दोन मार्गांनी प्रशिक्षण द्या :

1) येशूसारखे, त्याने लोकसमुदायाला शिकवले तसे लोकांच्या गटाशी बोलणे.
2) येशूसारखे लहान गटाला मार्गदर्शन करावे, आपल्या शिष्यांना त्याने असेच तयार केले.

प्रशिक्षण देण्याच्या हया दोन पद्धतींमध्ये समतोल राखा.

- नवीन पुढारी व नवीन मंडळया यांच्या नवजात बालकाप्रमाणे च काही/ तातडीच्या गरजा असतात. त्यांचे मार्गदर्शन करण्यासाठी त्यांना थोडया अधिक अनुभवी व्यक्तींची आवश्यकता असते.
- जुन्या मंडळया आणि परिपक्व पुढारी ह्यांच्याकडे अधिक लक्ष पुरवण्याची तशी गरज नसते. येशूप्रमाणेच पौलानेही त्याचे प्रशिक्षणार्थी त्याच्या मदतीशिवाय सेवा करण्यास तयार झाल्याबरोबर त्यांना मार्गदर्शन करणे थांबवले.
- आवश्यकता असणाऱ्यांसाठी कार्यशाळा व अल्पमुदतीचे अभ्यासक्रम आयोजित करा, परंतु यातून नव्या पुढायांच्या सर्व गरजा पूर्ण होतीलच असे नाही. त्यांना येशू व पौलाने त्यांच्या प्रशिक्षणार्थींना केले तशाच प्रकारे मार्गदर्शन करा.

एक पुढारी दुसऱ्याला कशा प्रकारे मार्गदर्शन करतो? यासाठी पुढील सात गोष्टी लक्षात ठेवून करा :

- गट लहान ठेवा. तुम्ही प्रत्येक प्रशिक्षणार्थीला मदत करण्यास वेळ दिला पाहिजे.
- पाळकपणाची आदर्श कौशल्ये. सहज अनुकरण करता येईल अशा प्रकारे काम करा.
- प्रत्येक प्रशिक्षणार्थीचा अहवाल ऐका. प्रत्येक प्रशिक्षणार्थीने आपल्या कामाचा. शेवटच्या सभेपासून आतापर्यन्त त्याने व त्याच्या मंडळीने काय केले आणि त्याच्या मंडळीच्या गरजा काय आहेत याविषयी अहवाल देणे/अगत्याचे आहे.
- प्रत्येक प्रशिक्षणार्थीला कार्य क्रमांची आखणी करण्यास मदत करा. तो व त्याची मंडळी त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी काय करणार आहेत ते लिहून का. नव्या करारानुसार आवश्यक असतील त्या गोष्टी

अंगवळणी पडतील कृती कार्यक्रम करा आणि अद्याप ज्या उणीवा किंवा दुर्बलता असेल तर ती दूर करा. नकारात्मक समस्यांवर अधिक वेळ खर्च करण्याचे टाळा. मार्गदर्शन करण्याच्या प्रत्येक सभेमध्ये काहीतरी नवीन सांगा; त्यामुळे नवीन मंडळीची उभारणी होण्यास मदत होईल.

- प्रशिक्षणार्थी काय वाचतात ते त्यांना तुम्हांला सांगण्यास सांगा. मागच्या वेळी वाचण्यास दिलेल्या वाचनातून त्यांना काय शिकायला मिळाले?
- नवीन काही वाचण्यास द्या. उपलब्ध अभ्यासक्रमांची यादी काळजीपूर्वक पाहून प्रत्येक विद्यार्थ्याच्या योजनांना अनुरुप असे अभ्यासक्रम निवडा. शिकणारे सर्वजण एकाच गोष्टीचा अभ्यास करणार नाहीत.
- एकमेकांसाठी प्रार्थना करा. मार्गदर्शन व सामर्थ्य मिळावे आणि तुम्ही सेवा करीत असलेल्या लोकांसाठी प्रार्थना करा.

**पवित्र शास्त्रातील मार्गदर्शन करणाूया 'साखळया'** (कोणी कोणाला मार्गदर्शन केले हे बाणाने दाखवले आहे)

**इथ्रो → मोशे → इस्राएलाचे वडीलजन,** ह्यांनी इस्राएल लोकांचे पाळकपण केले.

**मोशे → यहोशवा,** ह्याने इस्राएलाच्या सैनिकांना वचनदत्त प्रदेश ताब्यात घेण्यासाठी मार्गदर्शन केले.

**दबोरा → बराक,** ह्याने मूर्तिपूजक कनानी लोकांची पराभव करण्यासाठी इस्राएलाच्या सैन्याचे नेतृत्व केले.

**एली → शमुवेल → शौल राजा व दावीद राजा.**

**नाथान → दावीद → शलमोन → शबाची राणी**

**एलीया → अलिशा → योशीया राजा.**

**दानीएल → नबुखद्नेस्सर**

**मर्दखय → एस्तेर**

**येशू → त्याचे शिष्य → नवीन मंडळयांचे वडीलजन**

**फिलिप्प → कूशी** (इथिओपिअन) **अधिकारी.**

**प्रिस्किल्ला व अक्विल्ला → अपुल्लो.**

**पौल → तिमथी → ''विश्वासू माणसे'', → ''इतरांनाही''** (2 तीमथ्य 2:2)

**2. तुमच्या सहकाूयांशी चर्चा करुन आठवडयामध्ये ते करणार असलेल्या कार्यक्रमांची आखणी करा.**

- तुमच्या मंडळीतील पुढारी म्हणून सेवा करण्यासाठीचे प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली पाहिजे अशा विश्वासणाूयांची भेट ह्या त्यांना नियमित मार्गदर्शन करण्यासाठी एखाद्या प्रशिक्षकाची व्यवस्था करा.
- समजा त्या भागतील इतर मंडळयांमधील नेत्यांना मार्गदर्शनाची आवश्यकता असेल तर तशी व्यवस्था करण्यासाठी त्यांची भेट ह्या.
- कोणत्याही प्रकारच्या मार्गदर्शनाची गरज असणाूया विश्वासणाूयांना किंवा मित्रांना जाऊन भेटा. त्यांच्या गरजा आणि सेवा कार्याच्या संधी जाणून घेण्यासाठी त्यांचे म्हणणे ऐका.

**3. तुमच्या सहकाूयांशी चर्चा करुन येणाूया उपासनासभेची योजना आखा.**

गरजा आणि स्थानिक रिवाजांनुसार **कार्यक्रमांची निवड करा.** आणि नवीन पुढारी व मदतीची गरज असणाूयांना मार्गदर्शन करण्याचे सामर्थ्य मिळावे यासाठी प्रार्थना करा.

अक्विल्ला व प्रिस्किल्ला ह्यांनी अपुल्लोला कसे मार्गदर्शन केले हे **सांगा किंवा नाट्यरुपाने दाखवा.** त्यांच्याविषयी तुम्ही भाग 1 मध्ये शिकलेल्या मुद्यांवर चर्चा करा.

प्रशिक्षण देण्याच्या दोन प्रकारांमध्ये समतोल कसा साधायचा (भाग 1 मधून) हे **स्पष्ट करुन सांगा.** तसेच पवित्र शास्त्रातील ज्या लोकांनी इतरांना मार्गदर्शन केले त्याविषयी सांगा (भाग 1).

**पौल-तिमथी मार्गदर्शन साखळीले प्रात्यक्षिक दाखवा.**

- जमलेल्या लोकांना प्रत्येकी चार वेगवेगळे गट करायला सांगा. प्रत्येक गट म्हणजे एक वेगळे शहर आहे सांगा.
- कोणाला तरी 2 तीमथ्य 2:2 हे वचन वाचण्यास सांगा. हे वचन नवीन मंडळया तयार करण्याच्या ह्या साखळीतील चार दुवे प्रकट करते, याचे स्पष्टीकरण करुन सांगा : 1. अंत्युखियामध्ये पौल, 2. इफिसमध्ये तिमथी, 3. 'विश्वासू माणसे' यापैकी काहीजण कलस्सै येथे होते आणि 4. 'इतरही' यापैकी लावदिकीया येथे राहणारे काहीजण.

1. **अंत्युखिया.**-पौल व बर्णबा ह्यांनी देवाचे वचन प्रथम अत्युंखिया येथून बाहेर नेले. पहिल्या गटातील दोघा जणांना पवित्र शास्त्र घेऊन दुसऱया गटाकडे जाण्यास सांगा. दुसरा गट म्हणजे इफिस शहर.
2. **इफिस.**-पौलाने मीमथ्योचे मार्गदर्शन केले. देवाचे कार्य इफिसमध्ये पुढे नेण्यासाठी पौलाने त्याला तिथेच ठेवले.
3. **कलस्सै.**-तीमथ्याने ''विश्वासू माणसांना'' मार्गदर्शन केले. ही माणसे म्हणजे इफिस व कलस्सै येथील इतर वडीलजन होते. यात एपफ्रासचाही समावेश होता (कलस्सै 1:1-8).
4. **लावदिकीया.**-कलस्सै एपफ्रासने लावदिकीयामधील ''इतरांनाही'' मार्गदर्शन केले (कलस्सै. 4:12-13).

इथ्रोने मोशेचे मार्गदर्शन कसे केले निर्गम 18 हे सांगा किंवा नाट्यरुपाने दाखवा.

विश्वासणाऱ्यांनी नुकत्याच केलेल्या मार्गदर्शनाविषयीचे अहवाल मागवा.

मुलांनी तयारी केलेली कविता आणि नाटिका सादर करण्याची त्यांना **संधी द्या.**

दोन किंवा तीनचे गट करुन योजनांवर **चर्चा करा.** एकमेकांसाठी प्रार्थना करुन प्रोत्साहन द्या तसेच मार्गदर्शनासाठीच्या योजना आखा.

एलीयाने अलीशाला कसे मार्गदर्शन केले याचे **मुलांना नाट्यीकरण करण्यास सांगा.** मुलांना यावरील प्रश्नांची तयारी करुन ते प्रौढांना विचारता येतील.

**प्रभुभोजनाची ओळख करुन देण्यासाठी** रोम 19:3-5 वाचा. अक्विल्ला व प्रिस्किल्ला ह्यांनी रोममधील त्यांच्या घरी इफिसमध्ये (1 करिंथ 16:19) आणि बहुधा करिंथमध्ये मंडळयांची सुरुवात केली. यावरुन प्रेषितांच्या काळात विश्वासणारे प्रभुभोजनाचा विधी कोठे साजरा करीत याची आम्हांला आठवण होते. ते लहान लहान गटांमध्ये भाकरी मोडीत. याठिकाणी प्रत्येक विश्वासणाऱ्याला प्रत्येकाशी जवळची सहभागिता मिळत असे.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net